लोकमत

18 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**देवानंद शिंदे :** शिवाजी विद्यापीठ-इंडो जर्मन टूल रुम यांच्यात सामंजस्य करार; आवश्यक शिक्षण देणार

# औद्योगिक क्षेत्राला मनुष्यबळ पुरविणार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील औद्योगिक क्षेत्राला इंडो जर्मन टूल रुमच्या सहकार्याने पूरक मनुष्यबळ पुरविण्याचे प्रयत्न करणार आहे, असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.



शिवाजी विद्यापीठ आणि औरंगाबाद येथील इंडो जर्मन टूल्स रुम (आयजीटीआर) यांच्यात सामंजस्य मंगळवारी करार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहातील कार्यक्रमास 'आरजीटीआर'चे व्यवस्थापकीय संचालक हेमंत कापसे, बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, डॉ. अजित थेटे, जी. एस. कुलकर्णी, गोपाळ बेलूरकर प्रमुख उपस्थित होते.

कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, 'आयजीटीआर'च्या माध्यमातून कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी आवश्यक ते शिक्षण विद्यापीठामध्ये दिले जाईल. त्याचे प्रशिक्षण आयजीटीआर येथे विद्यार्थ्यांसह शिक्षकांना देण्यात येईल. उद्योग व्यवस्थेने कोणत्या क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे ते विषद करणे आवश्यक आहे.

## संशोधन, नवीन अभ्यासक्रम

या करारांतर्गत विद्यापीठातील संशोधकांसाठी औरंगाबाद येथे प्रगत संशोधनाची सोय, नवीन पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम, औद्योगिक प्रशिक्षण केंद्र आणि कौशल्य प्रशिक्षण व विकास, आदी संयुक्त प्रकल्पांवर काम केले जाणार आहे, असे कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले.

### प्रशिक्षण द्यावे

या कराराअंतर्गत कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रासाठी आवश्यक असणारी कौशल्य देण्यावर भर द्यावा तसेच सध्या कंपनीत कार्यरत असलेल्या कामगारांना प्रशिक्षण देण्याचे उपक्रम राबवावेत, अशी अपेक्षा उपस्थित उद्योजकांनी व्यक्त केली.




कोल्हापुरात मंगळवारी शिवाजी विद्यापीठ व औरंगाबादमधील इंडो जर्मन टूल रुम यांच्यात सामंजस्य करार झाला. यावेळी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे व 'आयजीटीआर'चे व्यवस्थापक हेमंत कापसे यांनी कागदपत्रांची देवाण-घेवाण केली. यावेळी परीक्षा नियंत्रक महेश काकडे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. आर. मोरे उपस्थित होते.

यावेळी हेमंत कापसे म्हणाले, औद्योगिक क्षेत्रास कुशल मनुष्यबळ पुरविणे हा संबंधित सामंजस्य कराराचा एक भाग आहे. त्यासह उद्योग क्षेत्रामध्ये नवतंत्रज्ञानामुळे सातत्याने होणारे बदल हे तळागाळांतील लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम केले जाईल. विद्यार्थ्यांना विविध तंत्रकौशल्य आत्मसात करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमास उद्योजक मोहन घाटगे, प्रताप पुराणिक, राज पाटील, आदी उपस्थित होते. उद्योग तंत्र संस्था आंतरक्रिया कक्षाचे समन्वयक हर्षवर्धन पंडित यांनी प्रास्ताविक केले. मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे समन्वयक अजित कोळेकर यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

18 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'आयजीटीआर'च्या मदतीने औद्योगिक क्षेत्राला पूरक मनुष्यबळ पुरवणार

## कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन: तंत्रज्ञान अधिविभाग व औरंगाबाद येथील आयजीटीआर यांच्यात सामंजस्य करार

प्रतिनिधी
कोल्हापूर

इंडो-जर्मन टूल रूम औरंगाबाद यांच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील तिन्ही जिल्ह्यांतील औद्योगिक व्यवस्थेला पूरक मनुष्यबळ पुरवण्याचा प्रयत्न सामंजस्य कराराच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. विद्यापीठाच्या व्यवस्थापन सभागृहात शिवाजी विद्यापीठ आणि औरंगाबाद येथील आयजीटीआर या संस्थेमध्ये झालेल्या सामंजस्य कराराप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, शिवाजी विद्यापीठात भविष्यात सेंटर ऑफ एक्सलन्स उभारले जाणार आहे. आयजीटीआर, औरंगाबाद यांच्या माध्यमातून कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठीचे आवश्यक ते शिक्षण विद्यापीठामध्ये दिले जाणार आहे. त्याचे प्रशिक्षण आयजीटीआर येथे विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांनाही दिले जाणार आहे. उद्योग व्यवस्थेनेही कोणत्या क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे, हे विषद करणे आवश्यक आहे. यासाठी उद्योजकांचे सहकार्य आवश्यक आहे. त्यामुळे आपल्या भागातील विद्यार्थ्यांना तशा प्रकारचे प्रशिक्षण उपलब्ध होईल.

इंडो-जर्मन टूल रूम औरंगाबादचे व्यवस्थापकीय संचालक हेमंत कापसे यांनी, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य व उद्योजक यांना आयजीटीआर-औरंगाबाद या संस्थेचे कार्य प्रेझेंटेशनद्वारे सादर केले. कापसे म्हणाले, उद्योग क्षेत्राला कुशल मनुष्यबळ पुरवणे हा या कराराचा एक भाग असून उद्योगक्षेत्रात नवतंत्रज्ञानामुळे सातत्याने होणारे बदल हे तळागाळातील लोकांपर्यंत आवश्यकतेनुसार पोहोचवण्याचे कार्य केले जाणार आहे. शिवाजी विद्यापीठ आणि आयजीटीआर यांच्या एकत्रित प्रयत्नातून येथील विद्यार्थ्यांना विविध तंत्रकौशल्य आत्मसात करण्याच्या संधी उपलब्ध होणार आहेत. तसेच या प्रयत्नातून उद्योगांच्या आवश्यकतेप्रमाणे कमी कालावधीचे सर्टिफिकेट कोर्सेस प्रशिक्षणार्थींना उपलब्ध होणार आहे. प्रास्ताविक उद्योग तंत्रसंस्था आंतरक्रिया कक्षाचे समन्वयक हर्षवर्धन पंडित यांनी केले, तर आभार मेकॅनिकल इंजिनिअरींगचे समन्वयक अजित कोळेकर यांनी मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि आयजीटीआर यांच्यात सामंजस्य करार झाला. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, आयजीटीआरचे संचालक हेमंत कापसे, सोबत इतर.

पुढारी 18 MAY 2016 जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# औद्योगिक व्यवस्थेस पूरक मनुष्यबळ पुरविण्याचा प्रयत्न करणार : कुलगुरू

## तंत्रज्ञान अधिविभाग व आयजीटीआर यांच्यात सामंजस्य करार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

इंडो जर्मन टूल रूम औरंगाबाद यांच्या सहकार्याने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तिन्ही जिल्ह्यांमधील औद्योगिक व्यवस्थेस पूरक मनुष्यबळ पुरविण्याचे प्रयत्न सामंजस्य कराराच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन कुलगुरू प्रा.डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन सभागृहातील सामंजस्य करार प्रसंगी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठात सेंटर ऑफ एक्सलन्स उभारले जाणार आहे. आयजीटीआरच्या माध्यमातून कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी आवश्यक शिक्षण दिले जाईल. कोणत्या क्षेत्रामध्ये कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे याची माहिती होण्यासाठी उद्योजकांचे सहकार्य आवश्यक आहे.

इंडो जर्मन टूल रूमचे व्यवस्थापकीय संचालक हेमंत कापसे यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्राचार्य व उद्योजकांसमोर आयजीटीआर संस्थेच्या कार्याची माहिती प्रेझेंटेशनद्वारे सादर केली. कापसे म्हणाले, उद्योग क्षेत्रास कुशल मनुष्यबळ पुरविणे कराराचा एक भाग आहे. विद्यापीठ आणि आयजीटीआरच्या एकत्रित प्रयत्नातून विद्यार्थ्यांना विविध तंत्रकौशल्य आत्मसात करण्याच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

यावेळी उपस्थित उद्योजकांनी कुशल प्रशिक्षणार्थींची गरज असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उद्योग तंत्रसंस्था आंतरक्रिया कक्षाचे समन्वयक हर्षवर्धन पंडित यांनी केले. मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे समन्वयक अजित कोळेकर यांनी आभार मानले. यावेळी बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, डॉ. अजित थेटे, डॉ. जी. एस. कुलकर्णी, गोपाळ बेलूरकर आदी उपस्थित होते.




**कोल्हापूर : सामंजस्य करारप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, इंडो जर्मन टूल रूमचे व्यवस्थापकीय संचालक हेमंत कापसे. डॉ. डी. आर. मोरे, डॉ. व्ही. एन. शिंदे, महेश काकडे, डॉ. जी. एस. कुलकर्णी, हर्षवर्धन पंडित आदी. (छाया : तय्यब अली)**

सकाळ 18 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'आयजीटीआरमधून पूरक मनुष्यबळ देणार'




**कोल्हापूर : आयजीटीआर व शिवाजी विद्यापीठ यांच्यात मंगळवारी झालेल्या सामंजस्य करारावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, आयजीटीआरचे व्यवस्थापकीय संचालक हेमंत कापसे, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. व्ही. एन. शिंदे, महेश काकडे, डॉ. अजित थिटे, डॉ. जी. एस. कुलकर्णी, गोपाळ बेलूरकर.**

कोल्हापूर, ता. १७ : इंडो-जर्मन टूल रूमच्या (आयजीटीआर) सहकार्याने शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील तिन्ही जिल्ह्यांमधील औद्योगिक व्यवस्थेस पूरक मनुष्यबळ पुरविण्याचे प्रयत्न सामंजस्य कराराच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले. विद्यापीठाच्या व्यवस्थापन सभागृहामध्ये विद्यापीठ आणि औरंगाबाद येथील आयजीटीआर या संस्थेशी झालेल्या सामंजस्य करार प्रसंगी ते बोलत होते.

डॉ. शिंदे म्हणाले, "भविष्यात सेंटर ऑफ एक्सलन्स् उभारले जाणार आहे. आयजीटीआरच्या माध्यमातून कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठीचे आवश्यक ते शिक्षण विद्यापीठामध्ये दिले जाईल. त्याचे प्रशिक्षण आयजीटीआर येथे विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांनाही दिले जाणार आहे. उद्योग व्यवस्थेनेही कोणत्या क्षेत्रामध्ये कुशल मनुष्यबळाची गरज आहे हे विशद करणे आवश्यक आहे. यासाठी उद्योजकांचे सहकार्य आवश्यक आहे. त्यामुळे भागातील विद्यार्थ्यांना तशा प्रकारचे प्रशिक्षण उपलब्ध होईल."

आयजीटीआरचे व्यवस्थापकीय संचालक हेमंत कापसे यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्राचार्य व उद्योजक यांना आयजीटीआरचे कार्य प्रेझेंटेशनद्वारे सादर केले. कापसे म्हणाले, "उद्योग क्षेत्रास कुशल मनुष्यबळ पुरविणे हा या कराराचा एक भाग असून उद्योगक्षेत्रामध्ये नवतंत्रज्ञानामुळे सातत्याने होणारे बदल हे तळागाळातील लोकांपर्यंत आवश्यकतेप्रमाणे पोचविण्याचे कार्य केले जाईल. विद्यापीठातील संशोधकांसाठी औरंगाबाद येथे प्रगत संशोधनाची सोय उपलब्ध होणार आहे. विद्यापीठ आणि आयजीटीआरचे यांच्या प्रयत्नातून येथील विद्यार्थ्यांना विविध तंत्रकौशल्य आत्मसात करण्याच्या संधी उपलब्ध होणार. तसेच, या प्रयत्नातून उद्योगांच्या आवश्यकतेप्रमाणे कमी कालावधीचे सर्टिफिकेट कोर्सेस प्रशिक्षणार्थींना उपलब्ध होणार आहे."

या वेळी अनेक उद्योजकांनी कुशल प्रशिक्षणार्थींची निकड असल्याचे सांगून संबंधीत विषयांवर चर्चा केली.

या वेळी बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, डॉ. अजित थेटे, डॉ. जी. एस. कुलकर्णी, गोपाळ बेलूरकर उपस्थित होते. उद्योग तंत्रसंस्था आंतर क्रिया हर्षवर्धन पंडित यांनी प्रास्ताविक केले. अजित कोळेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स 18 MAY 2016

# उद्योगांना कुशल मनुष्यबळ

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

औरंगाबादच्या इंडो जर्मन टूल रुमच्या (आयजीटीआर) सहकार्याने विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील तिन्ही जिल्ह्यांतील उद्योग जगताला पूरक मनुष्यबळ पुरविण्याचे प्रयत्न सामंजस्य कराराच्या माध्यमातून करण्यात येणार 'आहे' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. विद्यापीठाच्या व्यवस्थापन कौन्सिलच्या सभागृहामध्ये विद्यापीठ आणि औरंगाबाद येथील आयजीटीआर संस्थेमध्ये झालेल्या सामंजस्य करारप्रसंगी ते बोलत होते.



**सामंजस्य करारावेळी उपस्थित कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. जी. एस. कुलकर्णी, गोपाळ बेलूरकर, डॉ. हर्षवर्धन पंडित.**

**शिवाजी विद्यापीठाचा आयजीटीआरशी सामंजस्य करार**

तत्पूर्वी अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्राचार्य आणि उद्योजकांसमवेत झालेल्या बैठकीत कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक हेमंत कापसे यांनी प्रेझेंटेशनद्वारे कंपनीच्या कार्याची माहिती दिली. कापसे म्हणाले, 'उद्योग क्षेत्रास कुशल मनुष्यबळ पुरविणे हा कराराचा एक भाग असून उद्योगक्षेत्रामध्ये नवतंत्रज्ञानामुळे सातत्याने होणारे बदल हे तळागाळातील लोकांपर्यंत आवश्यकतेप्रमाणे पोहोचविण्याचे कार्य केले जाईल. उद्योगांच्या आवश्यकतेप्रमाणे कमी कालावधीचे सर्टिफिकेट कोर्सेसवर भर देण्यात येणार आहे.'

बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, डॉ. अजित थेटे, डॉ. जी. एस. कुलकर्णी, गोपाळ बेलूरकर आदी उपस्थित होते. टेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. हर्षवर्धन पंडीत यांनी प्रास्ताविक केले. मॅकेनिकल इंजिनीअरिंगचे अजित कोळेकर यांनी आभार मानले.

पुढारी 18 MAY 2016
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तंत्रज्ञानयुक्त संवादाभोवतीच विश्व फिरते : कुलगुरू डॉ. शिंदे

## 'बीएसएनएल'तर्फे आयोजित 'वर्ल्ड टेलिकम्युनिकेशन डे' उत्साहात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संवाद हा मानवी जीवनाचा आत्मा आहे. व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब संवादातून उमटत असते. तंत्रज्ञानयुक्त संवादाभोवतीच विश्व फिरत आहे. संवाद क्रांतीमुळे इंटरनेटच्या माध्यमातून सेवाक्षेत्रासह मोठ्या संधी उपलब्ध होत असून, याचा तरुणाईने चतूरपणे उपयोग करावा, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी मंगळवारी येथे व्यक्त केले.

दसरा चौक येथील राजर्षी शाहू स्मारक भवन येथे आयोजित दि इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) व 'बीएसएनएल'-कोल्हापूर सर्कलतर्फे 'माहिती तंत्रज्ञानाचे सामाजिक परिणाम' या विषयावर आयोजित परिसंवादात ते बोलत होते. 'बीएसएनएल'चे महाव्यवस्थापक सुशील मिश्रा होते. श्री. मिश्रा यांनी टेलिफोन व संवाद क्षेत्राची सुरुवात व सद्यस्थिती याबाबत स्लाईड शो माध्यमातून माहिती दिली. उपमहाव्यवस्थापक नितीन शुक्ला यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.




**कोल्हापूर : इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) व बीएसएनएलतर्फे आयोजित परिसंवादात मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. व्यासपीठावर सुशील मिश्रा, नितीन शुक्ला आदी. (छाया : पप्पू अत्तार)**

डॉ. शिंदे म्हणाले, मानवाच्या प्रगतीबरोबरच संवाद क्षेत्रातही आमूलाग्र बदल होत गेले. मानव ते मानव असा सुरू असलेला संवादामध्ये तंत्राने समावेश झाला. यानंतर मानव-तंत्रज्ञान-मानव असा संवाद सुरू झाला. यानंतरच खऱ्या अर्थाने माहिती तंत्रज्ञाने मानवी जीवन व्यापून टाकले. माध्यमातून व्यक्त होण्याची व्यापक साधने अस्तित्वात आली. जगात रोज पाच हजार नवीन वेबसाईट खुल्या होतात. जगाच्या लोकसंख्येइतके ई-मेलची रोज देवाण-घेवाण होते. या क्रांतीने भौगोलिक अंतर नष्ट झाले आहे.

इंटरनेट तर भावना व्यक्त करणारे सर्वात जवळचे साधन बनले आहे. रोजगार निर्मिती व सेवा क्षेत्रात इंटरनेटचा सहभाग अपरिहार्य बनणार असून तरुणाईने याचा सकारात्म वापर करावा, असे आवाहन शिंदे यांनी केले.

Times of India 18 MAY 2016 जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# University's job fair results to be announced today

File photo



The job fair held on Monday witnessed a huge crowd

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Results of the interviews held at the job fair at Shivaji University will be out Wednesday. Over 1,500 students had appeared for 450 positions at 22 companies on Monday at the university campus.

University officials said it was the second job fair in the past four months. It was received well by students and was conducted without any hitch.

This time on Monday, vice-chancellor Devanand Shinde along with Board of Colleges and University Development (BCUD) director, D R More, and acting registrar V N Shinde too visited the venue of the job fair and interacted with students, said the official.

The interviews were conducted for various administrative and technical posts.

The students who will get selected will get a direct call from the company and is likely to be directed for further formalities, the official said. He said the placement wing of the SUK has managed to get employment for over 2,000 students last year.

The university is planning to organise a mega job fair in July, wherein the number of participating companies will be higher than those in the January fair, said the official.

The Shivaji University nearly 300 affiliated colleges across Kolhapur, Sangli and Satara districts, with three lakh students.

**EMPLOYABILITY IN FOCUS**

# IGTR memorandum to boost skill devpt among students

TIMES NEWS NETWORK

The Shivaji University, Kolhapur (SUK) signed a memorandum of understanding (MoU) with Aurangabad-based Indo-German Tool Room (IGTR) on Tuesday.

Devanand Shinde, the SUK's vice-chancellor said that the IGTR is an International Organization for Standardization (ISO)-certified Tool Room and Training Centre. "It was established in 1990 and is the symbol of Indo-German co-operation targeted at promoting purposeful technical education for the youth in India," the VC said.

"Since the university aims to set up a centre of excellence at its campus in the near future, this MoU, gives us a chance to develop skilled manpower. The university is prepared to provide education to create better skilled individuals," he said.

He added that the IGTR MoU will be a great opportunity for the faculty as well as student exchange programmes.

The university on Tuesday had called a meeting of college principals and industry representatives on Tuesday to stress on the importance of skill-based education.

> Since the university aims to set up a centre of excellence at its campus in the near future, this MoU, gives us a chance to develop skilled manpower. The university is prepared to provide education to create better skilled individuals
>
> **Devanand Shinde** | SUK VC

IGTR managing director Hemant Kapse said that providing expert knowledge and information about ever-changing trends is a major criteria in the MoU.

"The MoU will pave the way for students to get to know about industrial requirements. We also plan to introduce short-term certificate courses which will prove quite helpful for students in their careers," he said.

An SUK official said that the IGTR was actively supported with generous assistance from the the German government, the Government of India as well as the state government. The organization implements its programme of technical training through its training centers located at Aurangabad. It also has sub-centres at Pune, Mumbai and Nagpur.

महाराष्ट्र टाईम्स

18 MAY 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्लेसमेंट सेलचा मिळाला आधार

Maruti.Patil
@timesgroup.com

**कोल्हापूर :** केवळ पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी तयार करून बेरोजगारांची संख्या वाढवण्यापेक्षा या विद्यार्थ्यांना कौशल्यावर आधारित नोकरीची संधी देण्याचा प्रयत्न शिवाजी विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेलने केला आहे. विद्यार्थ्यांना विविध कंपन्यामध्ये रोजगारांच्या संधी मिळवून देण्यासाठी आयोजित केलेल्या प्लेसमेंटमधून सहा वर्षात विद्यापीठातील चार हजार ७२४ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. दोन लाखांपासून दहा लाखांपर्यंत वार्षिक पॅकेज मिळवत विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता दाखवून दिली आहे. विद्यापीठाने प्लेसमेंटच्या माध्यमातून मार्केट व्हॅल्यू वाढवल्याने अनेक कंपन्या प्लेसमेंटचे आयोजन करण्यासाठी विद्यापीठाशी संपर्क साधत आहेत.

पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणानंतर विद्यार्थी नोकरीच्या शोधात असतात. मात्र विद्यापीठ हे केवळ पदवी देणारे ठिकाण न बनता करिअरची संधी देणारे केंद्र बनावे



यासाठी प्रयत्न सुरू होते. २००५मध्ये प्लेसमेंट सेलची स्थापना करून विविध कंपन्यांचे रोजगार मेळावे घेण्यात आले. यामधून अनेक विद्यार्थ्यांना देश-विदेशात नोकरीची संधी मिळाली आहे. अनेक पदव्युत्तर विद्यार्थी विविध देशात रिसर्च प्रोफेसर, रिसर्च अँड डेव्हलपमेंट व पीएचडी करत आहेत.

पहिल्या टप्प्यात दोन-अडीच लाखांच्या पॅकेजवर रुजू झालेल्या विद्यार्थ्यांना सध्या दहा ते पंधरा लाखांपर्यंतचे पॅकेज मिळत आहे. सायन्स फॅकल्टीसह, कॉमर्स, एमबीए, अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांचा यात समावेश आहे. २०१०पासून सरासरी ६०० ते ७०० विद्यार्थ्यांना प्लेसमेंटच्या माध्यमातून नोकरी मिळाली आहे. तर २०१५-१६मध्ये एक हजार दहा विद्यार्थ्यांना नोकरीची संधी प्राप्त झाली आहे. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने नुकतेच अकृषी विद्यापीठांचे रँकिंग जाहीर केले आहे. रँकिंग जाहीर करताना विद्यापीठच्या प्लेसमेंट सेंटरचा त्यात आवर्जुन उल्लेख केला.

विद्यापीठाने गुणवत्ता वाढवण्याबरोबर विद्यार्थीभीमूख शिक्षण प्रणालाची वापर केल्याने प्लेसमेंटच्या माध्यमातून आज अनेक कंपन्या विद्यार्थ्यांना नोकरी देण्यास तयार असल्याचे दिसून येत आहे.

### सहा वर्षातील प्लेसमेंट

| वर्ष | विद्यार्थी |
|---|---|
| २०१०-११ | ६७० |
| २०११-१२ | ७१० |
| २०१२-१३ | ८७० |
| २०१३-१४ | ५५६ |
| २०१४-१५ | ८०८ |
| २०१५-१६ | १११० |
| एकूण - | ४७२४ |

### टेक्निकलला फायदा

टेक्निकल विभागाचे शिक्षण घेतलेल्या बहुतांशी विद्यार्थ्यांना प्लेसमेंटचा फायदा झाला आहे. मात्र भाषा विषयाच्या विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे. तरीही इंग्लिश व हिंदी भाषेचा अनुवाद करण्यासाठी अनेकांनी मोक्याच्या जागा पटकावल्या आहेत. तर अर्थशास्त्र व राजशास्त्र विषयातून पदवी झालेल्या विद्यार्थ्यांनाही प्लेसमेंटचा फायदा झाला आहे.

**अभ्यासक्रम पूर्ण करताना विद्यार्थ्यांनी कौशल्य प्राप्त केलेले असते. त्यांच्या कौशल्याला वाव देण्यासाठी प्लेसमेंटचे आयोजन केले जाते. पारदर्शी मोहिमेमुळे आकडेवारी कमी दिसत असली, विद्यार्थी स्वत:च्या कौशल्यावर पदावर पोहोचले आहेत.**

**प्रा. डॉ. पी. एन. भोसले,**
**प्लेसमेंट समन्वयक**

### 'पुढारी'कार कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत

# डॉ. नरेंद्र जाधव यांचे उद्या व्याख्यान

कोल्हापूर : प्रतिनिधी

दैनिक 'पुढारी'चे संस्थापक संपादक पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव यांच्या २९ व्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वतीने 'पुढारी'कार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेंतर्गत शुक्रवारी (दि. २०) नामवंत अर्थशास्त्रज्ञ, खा. डॉ. नरेंद्र जाधव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर



यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त 'महामानव डॉ. आंबेडकर यांचे राष्ट्रीय कार्य' या विषयावर डॉ. जाधव विचार मांडणार आहेत. शाहू स्मारक भवन येथे सायंकाळी ५.०० वाजता हे व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. देवानंद शिंदे असतील.

'पुढारी'कार डॉ. ग. गो. जाधव यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वतीने व्याख्यानमालेचे आयोजन केले जाते. दरवर्षी दि. २० मे रोजी शाहू स्मारक भवन पान ९ वर ▸

**व्याख्यान नियोजित वेळेतच सायंकाळी ५.०० वा. सुरू होईल**

ख्यातनाम अर्थतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांचे 'महामानव डॉ. आंबेडकर यांचे राष्ट्रीय कार्य' या विषयावर व्याख्यान शाहू स्मारक भवन येथे सायंकाळी ५.०० वाजता वेळेवर सुरू होणार आहे. पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे डॉ. जाधव यांना पुण्याला परतावयाचे असल्याने श्रोते, निमंत्रितांनी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ. नरेंद्र जाधव यांचे उद्या व्याख्यान

(पान १ वरून) येथे होणाऱ्या या व्याख्यानमालेत विविध क्षेत्रातील नामवंत तज्ज्ञ, अभ्यासक, विचारवंतांनी विविध विषयांवर विचार मांडले आहेत. तत्कालीन केंद्रीय माहिती व तंत्रज्ञान मंत्री, दिवंगत प्रमोद महाजन, नियोजन आयोगाचे माजी सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर, संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे, भारतीय सैन्य दलाच्या नॉर्दन कमांडचे तत्कालीन चीफ लेफ्टनंट जनरल के. टी. पारनाईक, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, राज्याच्या कारागृह विभागाच्या तत्कालीन महानिरीक्षक मीरा बोरवणकर, ज्येष्ठ पत्रकार अरुण शौरी, अरविंद गोखले, कुमार केतकर, अरुण साधू, साहित्यिक डॉ. य. दि. फडके, माधव गडकरी, द. मा. मिरासदार, विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अरुण निगवेकर, लेफ्टनंट जनरल अर्जुन रे, मेजर जनरल (नि.) शशिकांत पित्रे आदींनी या स्मृतिव्याख्यानमालेत विचार मांडले आहेत.

शुक्रवार दि. २० रोजी नामवंत अर्थशास्त्रज्ञ, केंद्रीय नियोजन आयोगाचे माजी सदस्य, पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव 'महामानव डॉ. आंबेडकर यांचे राष्ट्रीय कार्य' या विषयावर पुष्प गुंफणार आहेत. केंद्रीय नियोजन आयोग, राष्ट्रीय सल्लागार परिषद अशा दोन शिखर संस्थांचे सदस्य म्हणून काम केलेल्या डॉ. नरेंद्र जाधव यांचा जीवनप्रवास थक्क करणारा; पण तितकाच प्रेरणादायी आहे. दलित समाजात जन्माला आलेल्या डॉ. जाधव यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने, त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवत आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रांत गरुडभरारी घेतली आहे. मुंबई विद्यापीठात अर्थशास्त्र विषयात एम.ए.ला प्रथम वर्ग मिळवणारे ते पहिले दलित विद्यार्थी आहेत.

अमेरिकेच्या इंडियाना विद्यापीठात सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय विद्यार्थी या बहुमानासह अर्थशास्त्रात डॉक्टरेट मिळवणाऱ्या डॉ. जाधव यांनी स्टेट बँक ऑफ इंडियात अधिकारी म्हणून तीन वर्षे नोकरी केली. यानंतर भारतीय रिझर्व्ह बँकेत अर्थतज्ज्ञ म्हणून तब्बल ३१ वर्षे काम केले. भारतीय रिझर्व्ह बँकेचे प्रधान आर्थिक सल्लागार आणि प्रमुख अर्थतज्ज्ञ म्हणून कार्यकारी संचालक पदावरून स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या डॉ. जाधव यांचे भारतीय अर्थकारण आणि आर्थिक धोरणांत महत्त्वपूर्ण योगदान आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीत भारताचे साडेचार वर्षे प्रतिनिधित्व केलेल्या डॉ. जाधव यांचे इथोपिया, अफगाणिस्तान यासारख्या मागास देशांच्या अर्थव्यवस्थांच्या पुनर्बांधणीत मोलाचे योगदान आहे. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू म्हणूनही डॉ. जाधव यांनी तीन वर्षे यशस्वी काम केले.

आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आदी विषयांवर डॉ. जाधव यांनी आजवर २७ अहवाल केंद्र, राज्य शासन तसेच रिझर्व्ह बँकेला सादर केले आहेत. महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्यासंबंधीचा अहवाल, राष्ट्रीय कौशल्यविकास योजनेबद्दलचा अहवाल, फॅक्टरीज ॲक्टसंबंधीचा अहवाल, अनुसूचित जाती-जमाती सबप्लॅनबद्दलचा अहवाल, भटक्या-विमुक्त जातीसंबंधीचा अहवाल आदी अहवाल विशेष लक्षणीय आहेत. तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी नेमलेल्या उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष असताना 'डॉ. आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक' उभारण्यासंबंधीचा मास्टर प्लॅन आणि नवी दिल्लीत १५ जनपथ या ठिकाणी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर फॉर सोशल जस्टिस' या संस्थेच्या उभारणीचा मास्टर प्लॅनही त्यांनी सरकारला सादर केला होता. या दोन्ही अहवालावर केंद्र सरकारची कार्यवाही सुरू आहे.

सामाजिक आणि ललित विषयांवर डॉ. जाधव यांचे आतापर्यंत २२ ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. २०० हून अधिक शोधनिबंध तसेच रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरसाठी लिहिलेली १०० भाषणे, अशी डॉ. जाधव यांची लेखनसंपदा आहे. मराठी साहित्यातील सारे विक्रम मोडून काढणाऱ्या 'आमचा बाप आन् आम्ही' या डॉ. जाधव यांच्या पुस्तकाचा देश आणि देशभरातील २० भाषांमध्ये अनुवाद झालेला आहे. आजही अनेक भाषांत अनुवाद होत आहे. सहा लाखांहून अधिक प्रती जगभर विकल्या गेल्याने हे पुस्तक मराठी भाषेतील चमत्कार मानले जाते. रवींद्रनाथ टागोर यांच्या १५० व्या जयंतीदिनी डॉ. जाधव यांनी संपादित व अनुवादित केलेल्या 'रवींद्रनाथ टागोर समग्र : जीवनदर्शन' या ग्रंथसंग्रहाद्वारे मराठी वाचकाला रवींद्रनाथ टागोर यांची सर्वस्पर्शी ओळख करून दिली.

डॉ. जाधव यांना आतापर्यंत राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील ६१ पुरस्कारांनी गौरवलेले आहे. फ्रान्स सरकारच्या वतीने दिला जाणारा सर्वोच्च नागरी पुरस्कार 'कमांडर ऑफ अॅकेडेमिक पाल्मस्' हा पुरस्कार मिळवणारे डॉ. जाधव पहिले भारतीय आहेत. डॉ. जाधव यांना चार राज्यातील विद्यापीठांनी 'डॉक्टर ऑफ लेटर्स'सारख्या मानद पदव्या प्रदान केल्या आहेत.

# आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी डॉ. चव्हाण यांची निवड

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**



शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे प्रा. डॉ. अर्जुन चव्हाण यांची भारत, मॉस्को व ताश्कंद हिंदी आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी निवड झाली आहे. २० ते २९ मे कालावधीत 'भूमंडलीकरण के दौर में भारतीय, उजबेकी एवं रशियन भाषा, साहित्य एवं संस्कृती' विषयावर चर्चासत्र होणार आहे. या चर्चासत्रासाठी बुधवारी प्रा. डॉ. चव्हाण रशियाला रवाना झाले. आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन एसएसआरआय मुंबई, रशियन राजकीय मानव्यशास्त्र विद्यापीठ, मॉस्को आणि लाल बहादूर शास्त्री भारतीय सांस्कृतिक केंद्र, ताश्कंद यांच्या संयुक्त विद्यमाने केले आहे.

चर्चासत्रात प्रा. डॉ. चव्हाण यांना सत्राचे अध्यक्ष व विषय तज्ज्ञ म्हणून निमंत्रित केले आहे. चर्चासत्रात 'भारत एवं रुस का अंत:संबंध हा शोधनिबंधांची सादरीकरणासाठी निवड झाली आहे. प्रा. डॉ. चव्हाण यांची आतापर्यंत ३५ पेक्षा अधिक समीक्षात्मक, मौलिक, संपादीत व अनुवादीत पुस्तके प्रकाशीत झालेली असून २०० हून अधिक राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे, परिसंवाद व कार्यशाळामध्ये अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, विषय तज्ज्ञ म्हणून सहभागी झाले आहेत.

लोकमत

# चर्चासत्रासाठी अर्जुन चव्हाण रशियाला रवाना



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी अधिविभागातील प्रा. डॉ. अर्जुन चव्हाण हे भारत, मॉस्को व ताश्कंद हिंदी आंतरराष्ट्रीय चर्चासत्रासाठी बुधवारी रशियाला रवाना झाले. मॉस्कोतील रशियन राजकीय मानव्यशास्त्र विद्यापीठ आणि ताश्कंदमधील लाल बहादूर शास्त्री भारतीय सांस्कृतिक केंद्रातर्फे मॉस्को व ताश्कंदमध्ये दि. २० ते २९ मे दरम्यान हे चर्चासत्र होणार आहे.

# औद्योगिक व्यवस्थेस पूरक मनुष्यबळ पुरविणार

## सामंजस्य करारप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची माहिती

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
इंडो जर्मन टूल रूम, औरंगाबाद यांच्या सहकार्याने विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील तिन्ही जिल्ह्यांमधील औद्योगिक व्यवस्थेस पूरक मनुष्यबळ पुरविण्याचे प्रयत्न सामंजस्य कराराच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याची माहिती विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन सभागृहामध्ये विद्यापीठ आणि औरंगाबाद येथील आयजीटीआर या संस्थेमध्ये झालेल्या सामंजस्य करारप्रसंगी ते बोलत होते. यावेळी बीसीयूडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा नियंत्रक महेश काकडे, डॉ. अजित थेटे, डॉ. अजित थेटे, डॉ. जी. एस. कुलकर्णी, गोपाळ बेलूरकर आदी मान्यवर उपस्थित होते.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि औरंगाबाद येथील आयजीटीआर संस्थेदरम्यान सामंजस्य करारप्रसंगी कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे. सोबत डॉ. डी. आर. मोरे, प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, महेश काकडे आदी.**

कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, भविष्यामध्ये सेंटर ऑफ एक्सलन्स विद्यापीठामध्ये उभारले जाणार आहे. आयजीटीआर, औरंगाबाद यांच्या माध्यमातून कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठीचे आवश्यक ते शिक्षण विद्यापीठामध्ये दिले जाईल. त्याचे प्रशिक्षण आयजीटीआर, औरंगाबाद येथे विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांनाही दिले जाणार आहे. उद्योग व्यवस्थेनेही कोणत्या क्षेत्रामध्ये कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे हे विशद करणे आवश्यक आहे. यासाठी उद्योजकांचे सहकार्य आवश्यक आहे. त्यामुळे आपल्या भागातील विद्यार्थ्यांना तशा प्रकारचे प्रशिक्षण उपलब्ध होईल.

इंडो जर्मन टूल रूम औरंगाबादचे व्यवस्थापकीय संचालक हेमंत कापसे यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयांचे प्राचार्य व उद्योजक यांना आयजीटीआर, औरंगाबाद या संस्थेचे कार्य प्रेझेंटेशनद्वारे सादर केले. हेमंत कापसे म्हणाले, उद्योग क्षेत्रास कुशल मनुष्यबळ पुरविणे हा या कराराचा एक भाग असून उद्योग क्षेत्रामध्ये नवतंत्रज्ञानामुळे सातत्याने होणारे बदल हे तळागाळातील लोकांपर्यंत आवश्यकतेप्रमाणे पोहोचविण्याचे कार्य केले जाईल. तसेच विद्यापीठातील संशोधकांसाठी औरंगाबाद येथे प्रगत संशोधनाची सोय उपलब्ध होणार आहे. शिवाजी विद्यापीठ आणि आयजीटीआर, औरंगाबाद यांच्या एकत्रित प्रयत्नातून येथील विद्यार्थ्यांना विविध तंत्रकौशल्य आत्मसात करण्याच्या संधी उपलब्ध होणार.

उद्योगांच्या आवश्यकतेप्रमाणे कमी कालावधीचे सर्टिफिकेट कोर्सेस प्रशिक्षणार्थींना उपलब्ध होणार आहेत. यावेळी अनेक उद्योजकांनी कुशल प्रशिक्षणार्थींची अत्यंत निकड असल्याचे सांगून संबंधित विषयांवर चर्चा केली. प्रास्ताविक उद्योग तंत्रसंस्था आंतरक्रिया कक्षाचे समन्वयक हर्षवर्धन पंडित यांनी केले, तर आभार मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे समन्वयक अजित कोळेकर यांनी मानले. या प्रसंगी अभियांत्रिकी विभागाचे समन्वयक, शिक्षक व उद्योजक उपस्थित होते.